# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.01.2026** **वार- बुधवार**

---

**आयुष्मान**

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत असलेल्या उपचारांची संख्या वाढविण्यात आल्यामुळं सर्वसामान्यांना दिलासा मिळाला आहे. योजनेत समाविष्ट असलेल्या पुणे जिल्ह्यातील रुग्णालयांची संख्या 68 वरून 206 करण्यात आली आहे. गेल्या वर्षभरात या योजनेंतर्गत सुमारे 42 हजार रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. आता ही संख्या 206 पर्यंत वाढविण्यात आली आहे. योजनेंतर्गत 1 हजार 356 प्रकारचे उपचार मोफत पुरविण्याची तरतूद करण्यात आली आहे. जिल्ह्यातील कोणत्याही उत्पन्न गटातील नागरिकाला योजनेचा लाभ घेता येणं शक्य आहे असं योजनेचे जिल्हा समन्वयक डॉक्टर वैभव गायकवाड यांनी सांगितलं.

**टूर-दुसराटप्पा**

पुणे ग्रँड टूर–२०२६ सायकलिंग स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्याचा आज दुपारी दीड वाजता मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. कॅम्पमधील लेडीज क्लब परिसरातून उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते झेंडा दाखवून या टप्प्याला सुरुवात करण्यात आली. एकंदर १०९ किलोमीटर लांबीच्या या टप्प्यात पुणे शहर, पुरंदर, राजगड आणि हवेली या चार तालुक्यांतील ऐतिहासिक, ग्रामीण आणि डोंगराळ भागांतून जाणारा आव्हानात्मक मार्ग होता. सिंहगड रस्त्यावरील नांदेड सिटी परिसरात हा टप्पा पूर्ण झाला.

**टूर-तिसराटप्पा**

पुणे ग्रँड टूर अंतर्गत गुरुवारी २२ जानेवारीला टप्पा क्रमांक तीनचं सासवड ते बारामती दरम्यान आयोजन करण्यात आलं आहे. या स्पर्धेची सुरुवात दुपारी साडेबारा वाजता सासवडमधल्या नगरपरिषद, चंदन टेकडी इथून होणार असून बारामती इथल्या विद्या प्रतिष्ठान कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात त्याचा शेवट होणार आहे. या टप्प्याची एकंदर लांबी १३७ पूर्णांक ७ किलोमीटर आहे.

**चौथाटप्पा-सुटी**

या स्पर्धेच्या चौथ्या टप्प्याच्या अनुषंगानं पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व सरकारी आणि खासगी शाळा २३ जानेवारीला दुपारी १२ वाजेपर्यंत सुरु ठेवाव्यात; त्यांनतर शाळा बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डूडी यांनी जारी केले आहेत.

स्पर्धेचा चौथा टप्पा बालेवाडी ते बालगंधर्व रंगमंदिर या दरम्यान आयोजित करण्यात आला असून त्याचं एकंदर अंतर ५८ किलोमीटर आहे.

बालेवाडी इथल्या छत्रपती शिवाजी मैदानावर स्पर्धेला सुरुवात होणार असून ती पुणे शहरहद्दीत जावून पुन्हा राजीव गांधी पुलमार्गे पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीत प्रवेश करणार आहे. सांगवी, वाकड, निगडी, त्रिवणीनगर, भोसरी, चिखली, पिंपरी काळेवाडी परिसरातून सायकलपटू जाणार आहेत.

**कवच**

पुणे ग्रँड टूरकरिता बजाज कंपनीकडून पुणे आणि पिंपरी चिंचवड पोलीस शहर आयुक्तालयासाठी प्रत्येकी २५ आणि पुणे जिल्हा ग्रामीण पोलीस दलाकरिता ५० अशा ‘डोमिनार ४००’ या अत्याधुनिक सुविधांनी युक्त १०० मोटर सायकली देण्यात आल्या असून सायकलपटूंना सुरक्षा कवच म्हणून काम करीत आहेत.

**शाळा**

पुण्यातील महेश बालभवनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या सामूहिक शालेय नृत्यस्पर्धेत इयत्ता पहिली ते चौथी या गटात श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्राथमिक शाळेनं प्रथम क्रमांक आणि तापडिया करंडक पटकावला. इयत्ता पाचवी ते नववी या गटात ढोले पाटील स्कूल फॉर एक्सलन्स या शाळेनं प्रथम क्रमांक आणि करंडक पटकावला. या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील 47 नामांकित शाळांमधून 800 विध्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**जप्ती**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर वसुलीसाठी आजपासून जप्ती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात थकबाकीदारांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून २१ जानेवारी २०२६ पासून ही मोहीम शहरभर व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. यासंदर्भात आज झालेल्या आढावा बैठकीत महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर आणि कर संकलन विभागाचे उपायुक्त पंकज पाटील यांनी विभागातील सर्व सहाय्यक मंडल अधिकाऱ्यांना थकबाकीदारांवर कोणतीही सूट न देता कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यामुळं नागरिकांनी वर्तमान आर्थिक वर्षातील तसंच थकीत मालमत्ता कर तत्काळ भरून जप्तीची कटू कारवाई टाळावी, असं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**